बुधवार, दि ८ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष १३ वे ● अंक २९ वा ● किंमत २ रु. ● पाने ४

RNI: MAHMAR/2013/50827 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

https://yuvaadarsh.com

युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/

# समर स्पेशल गाड्या व 'छपरा एक्सप्रेस' पुन्हा सुरु करा

## मराठवाड्यातील प्रवाशांच्या सोयीसाठी खासदार डॉ. कल्याण काळे यांची रेल्वे मंत्रालयाकडे मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** मराठवाडा विभागातील वाढत्या प्रवासी संख्येचा विचार करून प्रवाशांना अधिक सुलभ व सुरक्षित रेल्वे सेवा उपलब्ध व्हावी यासाठी खासदार डॉ. कल्याण काळे यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे ईमेलद्वारे निवेदन सादर केले आहे.

दरवर्षी एप्रिल ते जून या ग्रीष्मकालीन कालावधीत मराठवाडा (जालना, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, हिंगोली आदी) भागातून मुंबई, नाशिक, मडगाव, सूरत, अहमदाबाद, नागपूर, जोधपूर व कोल्हापूर या प्रमुख शहरांकडे प्रवास करणाऱ्या नागरिकांची संख्या लक्षणीय वाढते. सध्या उपलब्ध रेल्वेगाड्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी होत असून, प्रवाशांना आरक्षण मिळण्यात तसेच प्रवासादरम्यान अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित मार्गांवर ग्रीष्मकालीन विशेष रेल्वेगाड्या सुरू करण्याची आवश्यकता असल्याचे खासदार डॉ. काळे यांनी नमूद केले आहे. या गाड्यांच्या सुरूवातीमुळे प्रवाशांची गर्दी कमी होऊन अधिक सुसूत्र व सोयीस्कर प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

तसेच, जालना ते छपरा (बिहार) दरम्यान पूर्वी चालविण्यात आलेली ०७६५१/०७६५२ 'छपरा एक्सप्रेस' पुन्हा नियमित स्वरूपात सुरू करण्याबाबतही त्यांनी विशेष विनंती केली आहे. जालना हा औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचा जिल्हा असून, उत्तर भारतातील अनेक कामगार येथे वास्तव्यास आहेत. सध्या थेट रेल्वेसेवा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना अन्य स्थानकांवर गाडी बदलावी लागत असल्याने वेळ व कष्ट वाढत आहेत.



प्रस्तावित मार्ग छत्रपती संभाजीनगर, मनमाड, इटारसी, जबलपूर व वाराणसी मार्गे निश्चित केल्यास प्रवाशांना मोठ्या प्रमाणात लाभ होईल तसेच रेल्वेच्या महसुलातही वाढ होण्याची शक्यता आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे.

मराठवाडा विभागातील नागरिकांच्या प्रवास सुलभतेच्या दृष्टीने या मागण्यांवर सकारात्मक विचार करून आवश्यक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्यक्त केली आहे.

# नागेवाडी येथे पाणी टाकी बांधकामाचे उदघाटन

## आमदार अर्जुनराव खोतकर यांची प्रमुख उपस्थिती

**जालना । प्रतिनिधी -** महापालिका क्षेत्रातील नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या विशेष तरतुदीतून विविध विकासकामे हाती घेण्यात येत आहेत. याच पार्श्वभूमीवर जालना शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १२, नागेवाडी येथे पाणी टाकी बांधकामाचा उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना आमदार खोतकर यांनी सांगितले की, नागेवाडी परिसरातील नागरिकांना पाणीटंचाईचा सामना करावा लागू नये, यासाठी ही पाणी टाकी महत्त्वाची ठरणार असून भविष्यातही शहरातील प्रत्येक प्रभागात मूलभूत सुविधांचा विकास करण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील.

आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की,** जालना विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देणे व सर्वांगीण विकास साध्य करणे हेच आपले प्रमुख ध्येय असून, त्या दृष्टीने सुसंगत असा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. या आराखड्यानुसार टप्प्याटप्प्याने



विविध विकासकामे राबवली जात असून, संपूर्ण मतदारसंघाच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत.

या उद्घाटन सोहळ्याप्रसंगी शिवसेना संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, नगरसेवक सुनील बोर्डे, नगरसेवक रुबीना माजित पठाण, नगरसेविका श्रीमती मयुरी दिनेश देने, नगरसेवक अनिल तिरुखे यांच्यासह बंडूभाऊ एखंडे, आनंद धोत्रे, रितेश पांचारिया, संतोष रासवे, अनिल एखंडे, अक्षय मोरे, सिताराम कातोरे, भानुदास मामा भुसारे, सदाशिव भुसारे, शिवदास भुसारे, सतीश महाराज, योगेश एखंडे, संतोष भुसारे, गणेश भुसारे, कृष्णा एखंडे, संतोष एखंडे, वसंतराव एखंडे,प्रदिप एखंडे,मयुर एखंडे,अक्षय बनसिले, प्रदीप रत्नपारखे, सचिन सहाने, ओम काकड तसेच नागेवाडी परिसरातील महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते भूमिपूजन व उद्घाटन विधी पार पडला. स्थानिक नागरिकांनी या विकासकामाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. या पाणी टाकीमुळे परिसरातील पाणीपुरवठा अधिक सुरळीत होणार असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठी सोय होणार आहे.

# विकासाच्या रस्त्यावर काचा टाकाल तर आम्ही त्यावर रस्ता करून चालण्यास तयार

## अक्षय गोरंट्याल यांचा विरोधकांना टोला

**जालना । प्रतिनिधी -** महानगरपालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार खडाजंगी पाहायला मिळाली. तब्बल चार तास चाललेल्या या सभेत आठ वेळा गोंधळ उडाल्याने सभागृह अक्षरशः रणांगण बनले होते. भाजप आणि शिवसेना नगरसेवक आमनेसामने येताच वातावरण चांगलेच तापले.

> ''अंधेरे को पूछो हीरे की चमक क्या है, वरना धूप में तो फेंके हुए कांच के टुकड़े भी चमकते हैं,''

या गदारोळाच्या पार्श्वभूमीवर भाजप नगरसेवक अक्षय गोरंटयाल यांनी आक्रमक भूमिका घेत विरोधकांवर थेट हल्लाबोल केला. ''महापौरांच्या परवानगीशिवाय उभं राहून बोलणं चुकीचं आहे,'' असा स्पष्ट इशारा देत त्यांनी सभेतील शिस्तभंगावर बोट ठेवले.



गोरंटयाल म्हणाले की, ''मी महापौरांच्या परवानगीनेच विषय पत्रिका हाताळत होतो. मात्र शिवसेनेचे नगरसेवक कमलेश खरे यांनी परवानगी न घेता उभं राहून आक्षेप घेणं सुरू केलं, जे पूर्णपणे नियमबाह्य आहे.'' या प्रकारामुळे सभागृहात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. महापौरांनी हस्तक्षेप करत खरे यांना बसण्यास सांगितल्याने परिस्थिती नियंत्रणात आली.

आमची भूमिका ही विकासाची आहे. त्यामुळे या वाटेवर कुणी काचा टाकल्या तरी या काचावर रस्ता,नाले बांधून चालण्याची ताकद आम्ही ठेवतो अशी प्रतिक्रिया भाजप नगरसेवक अक्षय गोरंटयाल यांनी देत विरोधकांना सज्जड दम दिला आहे.

त्यांच्या या वक्तव्यामुळे शहरात एकच खळबळ उडाली. सत्ताधाऱ्यांनी विकासकामांचा ठसा उमटवला असल्याचा दावा करत त्यांनी शहरातील जनतेला सर्व कामांची जाणीव असल्याचेही ठासून सांगितले.

दरम्यान, सभागृहात वाद-विवाद आणि शाब्दिक चकमकी होणे हे नवे नसल्याचे सांगत गोरंटयाल यांनी विरोधकांच्या टीकेलाही प्रत्युत्तर दिले. मात्र कालच्या सभेत झालेला गोंधळ आणि वारंवार कामकाज ठप्प होणे, यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

एकंदरीत, जालना महापालिकेची पहिलीच सभा गाजली ती वकिासाच्या मुद्द्यांपेक्षा राजकीय संघर्षामुळेच. पुढील काळात हा संघर्ष अधिक तीव्र होणार का, याकडे शहरवासियांचे लक्ष लागले आहे.

अक्षय गोरंट्याल यांनी पुन्हा एकदा सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक पाहायला मिळाली. या दरम्यान नगरसेवक अक्षय गोरंट्याल यांनी शायरीच्या माध्यमातून विरोधकांवर अप्रत्यक्ष टीका करत नागरिकांचे लक्ष वेधून घेतले.

''अंधेरे को पूछो हीरे की चमक क्या है, वरना धूप में तो फेंके हुए कांच के टुकड़े भी चमकते हैं,'' अशी शायरी सादर करत अक्षय गोरंट्याल यांनी विरोधकांना टोला लगावला.

# जालन्यात अधिक मासनिमित्त भव्य 'श्रीमद् भागवत कथा'; भास्कर दानवे यांच्याकडून स्थळ पाहणी

**जालना । प्रतिनिधी -** अधिक मासाचे औचित्य साधून हरे कृष्ण सत्संग समिती यांच्या वतीने वेद माता गायत्री मंदिर परिसरात भव्य 'श्रीमद् भागवत कथा'चे आयोजन करण्यात आले आहे. या कथेच्या नियोजनासाठी व स्थळाच्या पाहणीसाठी भारतीय जनता पार्टी महानगर जिल्हाध्यक्ष श्री. भास्कर आबा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली.
या कथेचे प्रवचन गौरव कृष्ण गोस्वामी यांच्या रसाळ वाणीतून होणार असून, अधिक मासातील या आध्यात्मिक सोहळ्यामुळे परिसरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले आहे. कथेच्या निमित्ताने मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन मंडप व्यवस्था, बैठक व्यवस्था, वाहनतळ, पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच इतर तांत्रिक बाबींचा आढावा आजच्या पाहणीदरम्यान घेण्यात आला तसेच भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आल्या. अधिक मासातील या कथेमुळे धार्मिक व आध्यात्मिक वातावरण अधिक वृद्धिंगत होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## संपादकीय

# आकड्यांचा खेळ की विकासाचा खरा आराखडा?

नेपाळ हा भारताचा शेजारी देश असून भारताच्या मित्र देशांपैकी एक देश आहे. भारत आणि नेपाळची संस्कृतीही जवळपास सारखीच आहे. जगातील एकमेव हिंदू देश अशी नेपाळची ओळख आहे. भारतातही बहुसंख्य हिंदुधर्मीय लोक असून भारताचा सर्वाधिक विश्वासार्ह देश अशी नेपाळची ओळख आहे. स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच नेपाळशी आपले मैत्रीचे आणि सौहार्दाचे संबंध राहिले आहेत. भारत आणि नेपाळ यांच्या दरम्यानची सीमारेषाही आपण मुक्त केली आहे म्हणजे नेपाळमधील कोणताही नागरिक व्हिसा शिवाय भारतात प्रवेश करू शकतो तसेच भारतात व्यवसायही करू शकतो. नेपाळचे लाखो नागरिक आज भारतात वास्तव्य करून आहेत. दोन्ही देशात रोटीबेटीचा व्यवहार देखील होतो असे असले तरी तरी गेल्या काही वर्षात नेपाळ आणि भारतात प्रचंड कटुता निर्माण झाली आहे. दोन्ही देशातील सौहार्दपूर्ण संबंध बिघडले आहेत. एकेकाळी भारताला सच्चा मित्र मानणारा नेपाळ आता भारताला स्पर्धक समजू लागला आहे. इतकेच नाही तर भारताचा भूभाग आपल्या नकाशात दाखवून भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान देऊ लागला आहे. के पी ओली शर्मा नावाचे गृहस्थ जेंव्हा नेपाळचे पंतप्रधान बनले तेव्हापासून दोन्ही देशातील कटुता वाढत गेली. के पी ओली शर्मा हे नेपाळचे पंतप्रधान बनल्यावर त्यांनी भारताशी असलेले सौहार्दाचे संबंध तोडून टाकले आणि भारताला आपला प्रतिस्पर्धी म्हणून घोषित केले अर्थात याला चीन जबाबदार आहे. के पी ओली शर्मा चीन धार्जिणे होते. चीनच्या नादी लागून त्यांनी भारताच्या सतत खोड्या काढण्याचा उद्योग केला. कधी त्यांनी भारताचा भूभाग नेपाळच्या नकाशात दाखवला तर कधी नेपाळच्या चलनी नोटांवर भारताचा भूभाग छापून भारताला चिथावले. अर्थात हा सर्व चीनच्या रणनीतीचा भाग होता. भारताच्या शेजारी असलेल्या देशांना साम, दाम, दंड, भेद या मार्गाचा वापर करून भारताविरुद्ध फितवायचे आणि स्वतःकडे वळवायचे आणि त्याद्वारे भारतावर दबाव आणायचा ही रणनीती होती अर्थात आजही ती आहे याच रणनितीला के पी ओली शर्मा हे बळी पडले आणि त्यांनी भारताला थेट आव्हान दिले त्यामुळे दोन्ही देशात कटुता निर्माण झाली. आता मात्र चित्र बदलत आहे कारण चीन धार्जिणे के पी ओली शर्मा यांच्या भ्रष्ट कारभाराविरोधात नेपाळच्या जेन झी ने मागील वर्षी मोठा उठाव केला त्यात के पी ओली शर्मा यांना आपली खुर्ची सोडावी लागली. के पी ओली शर्मा पदभ्रष्ट झाल्यानंतर नेपाळमध्ये निवडणुका झाल्या. या निवडणुकीत ३५ वर्षाच्या बालेंद्र शहा उर्फ बालेन या तरुणाच्या राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाने ( आर एस पी ) बहुमत मिळवले आणि त्यांच्या पक्षाने बालेंद्र शहा यांची नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून घोषणा केली. राम नवमीच्या मुहूर्तावर बालेंद्र शहा यांनी नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. बालेंद्र शहा यांनी नेपाळची सूत्रे हाती घेतल्यामुळे भारत आणि यांच्यातील संबंध पूर्वीप्रमाणे सौहार्दाचे होतील अशी आशा निर्माण झाली आहे कारण पंतप्रधान पदाची सूत्रे हाती घेतल्या पासून त्यांनी भारताविरुद्ध एकही वक्तव्य केले नाही अर्थात काठमांडूचे महापौर असताना त्यांनी भारत विरोधी भूमिका घेत ग्रेटर नेपाळचे समर्थन करत भारताला दुखावले होते आता मात्र त्यांची ती भूमिका बदलेल अशी आशा करायला हरकत नाही कारण बालेंद्र शहा पंतप्रधान बनल्यावर आपल्या पतप्रधानांनी त्यांचे अभिनंदन केले त्यांनीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानत दोन्ही देशात मैत्रीचे संबंध निर्माण होतील अशी ग्वाही दिली. अर्थात त्यांच्याकडून तशी अपेक्षा करायला हरकत नाही कारण बालेंद्र शहा आणि आपले खूप जवळचे संबंध आहेत. बालेंद्र शहा यांचे शिक्षण भारतातच झाले आहे. त्यांनी बंगळुरूच्या विश्वेशरय्या युनिव्हर्सिटीमधून स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले आहे. त्यांची एक बहीण बंगळुरूमध्येच राहते त्यामुळे भारताबाबत त्यांच्या मनात निश्चितच आदर असेल. अर्थात त्यांच्या मनात चीनबद्दल असलेले आकर्षण लपून राहिले नाही असे असले तरी पंतप्रधान म्हणून ते चीनच्या कच्छपी लागणार नाहीत अशी आशा करूया. भारतानेही याबाबत कुटनितीक पावले टाकून बालेंद्र शहा यांना भारताकडे वळवण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लवकरात लवकर नेपाळचा दौरा करून बालेंद्र शहा यांची भेट घ्यावी त्यामुळे दोन्ही देशात बिघडलेले संबंध पूर्ववत होतील आणि दोन्ही देशात मैत्रीचे संबंध प्रस्थापित होतील.

# विमा कंपनीचा मनमानी कारभार ग्राहकाला भोवला; राष्ट्रीय ग्राहक आयोगाचा ३.८० कोटींच्या नुकसान भरपाईचा आदेश

विमा दाव्याची परतफेड करताना विमा कंपन्यांनी मनमानी आणि तकलादू कारणे देणे हे सेवेतील त्रुटी असल्याचे स्पष्ट करत राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोगाने एका महत्त्वपूर्ण निकालात ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीला मोठा दणका दिला आहे. 'अधुरस' या तेलुगू चित्रपटाच्या वितरकाने दाखल केलेल्या तक्रारीवर निर्णय देताना, आयोगाने विमा कंपनीने दिलेले दावा नाकारण्याचे पत्र रद्दबातल ठरवले आणि चित्रपट वितरकाला ३.८० कोटी रुपयांची नुकसान भरपाई व्याजासह देण्याचे आदेश दिले. चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखांमधील बदलाची योग्य माहिती देऊनही विमा कंपनीने दावा नाकारणे हे पूर्णपणे चुकीचे असल्याचे आयोगाने आपल्या निकालात म्हटले आहे.

मेसर्स एशियन थिएटर्स प्रा. लि. या चित्रपट वितरक कंपनीने 'अधुरस' या चित्रपटासाठी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडून वितरक महसूल तोटा विमा पॉलिसी घेतली होती. सुरुवातीला चित्रपट २३ डिसेंबर २००९ रोजी प्रदर्शित होणार होता, परंतु तत्कालीन तेलंगणा आंदोलनामुळे प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलून १३ जानेवारी २०१० करण्यात आली. या बदलांची माहिती वितरकाने विमा कंपनीला आणि ब्रोकरला वेळेवर दिली होती. आंदोलनामुळे चित्रपट प्रदर्शनात आलेल्या व्यत्ययामुळे आणि अतिरिक्त प्रसिद्धी खर्चामुळे झालेल्या नुकसानीचा दावा कंपनीने केला होता. मात्र, विमा कंपनीने माहिती दडवणे आणि पॉलिसीच्या अटींचे उल्लंघन केल्याचा आरोप करत १२ जून २०१२ रोजी हा दावा फेटाळला होता.

या निकालावर प्रतिक्रिया व्यक्त करताना, नोटरी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. महेश एस. धन्नावत यांनी ग्राहक आयोगाच्या भूमिकेचे कौतुक केले. ॲड. धन्नावत म्हणाले, ''विमा कंपन्या अनेकदा ग्राहकांना लहानसहान आणि तांत्रिक कारणे पुढे करून कायदेशीर कचाट्यात अडकवण्याचा प्रयत्न करतात. ग्राहकाने सर्व अटींची पूर्तता करूनही त्याचा हक्काचा दावा नाकारणे हा निव्वळ अन्याय आहे. ज्याप्रमाणे नागरिकांनी न्यायाधीशांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करणे गैर आहे, त्याचप्रमाणे विमा कंपन्यांनी आपल्या अधिकारांचा गैरवापर करून ग्राहकांची पिळवणूक करणे हे सुद्धा गंभीर आहे. राष्ट्रीय ग्राहक आयोगाचा हा निर्णय अशा मनमानी कारभाराला चपराक देणारा असून, त्यामुळे सामान्य ग्राहकाचा न्यायव्यवस्थेवरील वश्विास अधिक दृढ होईल.''

आयोगाने आपल्या निरीक्षणात स्पष्ट केले की, वितरकाने प्रदर्शनाच्या तारखेतील बदलाची माहिती दिली नसल्याचा विमा कंपनीचा दावा पूर्णपणे खोटा आणि रेकॉर्डवरील पुराव्यांच्या विरोधात होता. ब्रोकरमार्फत दिलेली माहिती ही वैध मानली पाहिजे, असेही आयोगाने नमूद केले. निर्मात्याच्या वक्तव्यांमुळे नुकसान वाढले, हा विमा कंपनीचा युक्तिवादही आयोगाने पुराव्याअभावी फेटाळून लावला. आंदोलनामुळे झालेले नुकसान पॉलिसीअंतर्गत येत असल्याने आणि वितरकाने कोणत्याही अटींचे उल्लंघन केले नसल्याने, दावा नाकारणे हे सेवेतील त्रुटी असल्याचे आयोगाने म्हटले. त्यानुसार, आयोगाने विमा कंपनीला ३,८०,३५,०४५ रुपये ६% व्याजासह, तसेच १ लाख रुपये नुकसान भरपाई आणि ५०,००० रुपये खटल्याचा खर्च म्हणून देण्याचे आदेश दिले.




# आंध्र प्रदेशच्या राजधानीत बदल

**नवी दिल्ली -** आंध्र प्रदेशसाठी मोठा निर्णय घेत केंद्र सरकारने अमरावतीला () अधिकृत आणि कायमस्वरूपी राजधानीचा दर्जा दिला आहे. यासाठी ६ एप्रिल २०२६ रोजी गॅझेट नोटिफिकेशन जारी करण्यात आलं. राष्ट्रपती द्रौपदी मूर्मू यांच्या मंजुरीनंतर हा निर्णय अमलात आला.

आंध्र प्रदेश पुनर्गठन (संशोधन) विधेयक २०२६ ला संसदेत मंजुरी मिळाल्यानंतर हा निर्णय लागू करण्यात आला. या कायद्यामुळे राज्याच्या राजधानीबाबत अनेक वर्षांपासून सुरू असलेला संभ्रम अखेर संपुष्टात आला आहे.

**संसदेत मंजुरीनंतर निर्णय लागू**

संसदेने २ एप्रिल रोजी या विधेयकाला अंतिम मंजुरी दिली. लोकसभेनंतर राज्यसभेतही हे विधेयक आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आलं. या कायद्यामुळे आता भविष्यात राजधानी बदलण्याचे किंवा तीन-राजधानी मॉडेल लागू करण्याचे पर्याय जवळपास संपले आहेत. कायदा मंत्रालयाच्या नोटिफिकेशननुसार, हा सुधारित कायदा २ जून २०२४ पासून लागू मानण्यात येणार आहे. यामध्ये २०१४ च्या आंध्र प्रदेश पुनर्गठन कायद्यात बदल करण्यात आला आहे.

वायएसआर काँग्रेस पक्षाने ( ) या निर्णयाला विरोध दर्शवला आहे. पक्षाचा दावा आहे की, या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करण्यात आलं आहे, कारण राजधानी प्रकल्पासाठी त्यांनी आपली जमीन दिली होती.

अमरावतीला राजधानी बनवण्याची प्रक्रिया २०१५ मध्ये तेलगू देसम ( ) सरकारच्या काळात सुरू झाली होती. मात्र २०१९ मध्ये सत्तेत आल्यानंतर तीन-राजधानी मॉडेलचा प्रस्ताव पुढे आला आणि प्रकल्प रखडले.

२०२४ मध्ये सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतर अमरावतीला एकमेव राजधानी बनवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर प्रलंबित प्रकल्प पुन्हा सुरू करण्यात आले. या निर्णयामुळे आंध्र प्रदेशच्या प्रशासनिक स्थैर्याला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी मंदार ऑफसेट कचेरी रोड, जूना जालना जालना. ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून साप्ताहिक युवा आदर्श कार्यालय, १-२९-७४४, गांधीनगर, रोहनवाडी रोड, जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले आहे. संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके, ८३९००९८८८६, ८३९००४८८८६, कायदेशीर सल्लागार : ॲड. राहुल अरुणराव चव्हाण. या अंकात प्रसिद्ध झालेले मजकूर, लेख व त्यामधून व्यक्त होणारे मत याच्याशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही (सर्व वाद जालना न्यायालयातंर्गत) आरएनआय : MAHMAR/2013/50827

Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Mandar Offset, Kacheri Road, Old Jalna. Jalna. 431203 (Maharashtra) Place of Publication Office Weekly Yuva Aadarsh ,1-29-744, Gandhinagar, Rohanwadi Road, Jalna. 431203 (Maharashtra). Editor : Deepak Shrikrushna Shelke, Mob. 8390098886, 8390048886 RNI.: MAHMAR/2013/50827 Email. : yuva.aadarsh@gmail.com Website : https://yuvaadarsh.com

# मंठा तालुका औद्योगिकदृष्ट्या सक्षम केंद्र म्हणून विकसित होईल; रोजगारनिर्मितीसाठी औद्योगिकीकरण हाच प्रभावी पर्याय - आमदार लोणीकर

**मंठा । प्रतिनिधी -** ग्रामीण भागातील विकासाचा वेग वाढवण्यासाठी औद्योगिकरण ही अत्यावश्यक बाब आहे. उद्योगधंद्यांच्या माध्यमातून स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होऊन विकासाचा नवा अध्याय सुरू होऊ शकतो. सध्या रोजगाराच्या मर्यादित संधींमुळे मंठा तालुक्यातील अनेक युवकांना शहरांकडे स्थलांतर करावे लागते. ही परिस्थिती बदलण्यासाठी स्थानिक पातळीवरच रोजगारनिर्मिती होणे आवश्यक आहे. एमआयडीसीमुळे लघु, मध्यम व मोठ्या उद्योगांना चालना मिळून हजारो युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. यामुळे केवळ बेरोजगारी कमी होणार नाही, तर कुटुंबांचे आर्थिक स्थैर्यही वाढेल. मंठा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी एमआयडीसी उभारणी अत्यंत गरजेची असून, यामुळे तालुक्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळेल असे प्रतिपादन माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर यांनी केले.

आमदार बबनराव लोणीकर यांनी आज मंठा तालुक्यातील उमरखेडा, ठेंगेवडगाव आणि टोकवाडी या तीनही गावातील शासकीय जमिनीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी मंठा एमआयडीसीचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, मंठा एमआयडीसीसाठी आवश्यक असलेल्या सर्व पायाभूत सुविधा येथे उपलब्ध होऊ शकतात. औद्योगिक विकासासाठी आवश्यक असलेली पुरेशी जमीन, सुस्थितीत रस्ते, जलस्रोत, सातत्यपूर्ण वीजपुरवठा आणि आधुनिक दळणवळण सुविधा या सर्व बाबी मंठा तालुक्यात उपलब्ध आहेत. त्यामुळे उद्योग स्थापन करण्यासाठी हा परिसर अत्यंत अनुकूल असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले.

मंठा तालुक्याच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीने भौगोलिक व दळणवळणाच्या सुविधा अत्यंत अनुकूल असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले. पुढे बोलताना आमदार लोणीकर म्हणाले की, मंठा शहरातून छत्रपती संभाजीनगरजालनानांदेडहैदराबाद तसेच शेगावपंढरपूरसोलापूर असे दोन महत्त्वाचे राष्ट्रीय महामार्ग जात असल्यामुळे या भागाला उत्कृष्ट वाहतूक सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे कच्चा माल आणणे आणि तयार माल देशभर पाठवणे सोपे होणार आहे. याशिवाय, जालना एमआयडीसीमधून देशभर स्टीलचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा होत असून जालना येथे उभारण्यात येणारा ड्रायपोर्ट हा औद्योगिक विकासाला अधिक गती देणारा ठरणार आहे. या सर्व सुविधा लक्षात घेता मंठा हा उद्योगांसाठी अत्यंत धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाचा परिसर असल्याचे देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी नमूद केले.

एमआयडीसीसाठी आवश्यक असलेल्या पाणीपुरवठ्याबाबतही कोणतीही अडचण येणार नसल्याचे आमदार लोणीकर यांनी स्पष्ट केले. वॉटर ग्रीड योजनेच्या माध्यमातून एमआयडीसीसाठी मुबलक पाणी उपलब्ध करून देता येणार असून, यासाठी आवश्यक तरतूदही करण्यात आलेली आहे. वॉटर ग्रीडच्या रॉ वॉटरचा वापर औद्योगिक गरजांसाठी करण्याची सुविधा उपलब्ध असल्यामुळे भविष्यातील उद्योगांच्या गरजा सहज पूर्ण होऊ शकतील. मंठा तालुक्यामध्ये सोलरच्या माध्यमातून मुबलक प्रमाणात वीज निर्मिती देखील केली जाणार आहे. १०० मेगावॅट प्रकल्प मंठा तालुक्यात उभारण्यात येत आहे त्यामुळे उद्योगासाठी लागणारी मुबलक वीज याच ठिकाणी निर्माण केली जाणार आहे. त्यामुळे पाणी, वाहतूक आणि औद्योगिक पूरक सुविधा या सर्व बाबींचा विचार करता मंठा एमआयडीसी उभारणीसाठी पूर्णपणे सक्षम असल्याचा वश्विास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला.

मंठा तालुक्याच्या औद्योगिक विकासासाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करण्यात येणार असून प्लॉटिंग, झोनिंग, सांडपाणी व्यवस्थापन, पर्यावरणीय संतुलन, सुरक्षा आणि अग्निशमन सुविधा यावर विशेष लक्ष दिले जाणार आहे. उद्योगांना सुलभ परवानग्या मिळाव्यात यासाठी सिंगल विंडो प्रणाली लागू करण्याचा प्रयत्न केला जाईल, जेणेकरून गुंतवणूकदारांना कोणत्याही अडचणीशिवाय उद्योग सुरू करता येतील. एमआयडीसीमुळे केवळ उद्योगच नव्हे तर पूरक व्यवसायांनाही चालना मिळेल. वाहतूक, गोदाम, सेवा क्षेत्र, लघुउद्योग आणि व्यापार-व्यवसाय वाढतील असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.



महिलांसाठीही विविध उद्योगांमध्ये तसेच स्वयंरोजगाराच्या माध्यमातून संधी निर्माण होतील. कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून युवकांना आवश्यक प्रशिक्षण देऊन सक्षम मनुष्यबळ तयार करण्यात येईल. या सर्व प्रक्रियेमुळे मंठा तालुक्यात आर्थिक उलाढाल मोठ्या प्रमाणात वाढेल, नागरिकांचे उत्पन्न वाढेल आणि जीवनमान उंचावेल. स्थलांतर कमी होऊन गावांमध्येच रोजगार उपलब्ध होईल. रस्ते, पाणी, वीज यांसारख्या मूलभूत सुविधांचा विकास होऊन तालुक्याचा चेहरामोहरा बदलणार आहे. त्यामुळे मंठा एमआयडीसी हा केवळ औद्योगिक प्रकल्प नसून तालुक्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी भक्कम पाया ठरणार असल्याचा वश्विास आमदार लोणीकर यांनी व्यक्त केला.

यावेळी पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, एमआयडीसीच्या स्थापनेमुळे स्थानिक शेतकऱ्यांनाही अप्रत्यक्ष लाभ होणार आहे. कृषी उत्पादनावर आधारित प्रक्रिया उद्योग सुरू झाल्यास शेतमालाला योग्य दर मिळेल आणि शेतीपूरक उद्योगांना चालना मिळेल. यामुळे कृषी क्षेत्र आणि उद्योग क्षेत्र यामध्ये समन्वय निर्माण होऊन ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक बळकट होईल. तसेच, एमआयडीसीमुळे शिक्षण आणि तांत्रिक कौशल्य विकासालाही चालना मिळणार आहे. नवीन उद्योगांच्या गरजेनुसार स्थानिक शैक्षणिक संस्था आणि प्रशिक्षण केंद्रांमध्ये आधुनिक अभ्यासक्रम सुरू होतील. त्यामुळे युवक अधिक कौशल्यसंपन्न बनून उद्योगांसाठी तयार होतील असेही आमदार बबनराव लोणीकर यावेळी म्हणाले.

आगामी काळात मंठा तालुका औद्योगिकदृष्ट्या सक्षम केंद्र म्हणून विकसित होईल असा वश्विास आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला यावेळी उमरखेडा ठेंगेवडगाव व टोकवाडी या गाव शिवारात प्रत्यक्ष पाहणी प्रसंगी अंकुशराव अवचार बाबुराव शहाणे पंजाबराव बोराडे नितीन राठोड अजय अवचार शिवाजी जाधव दीपक बोराडे डॉ. दत्तात्रय काकडे अजय अवचार नितीन सरकटे शरद पाटील दौलत शहाणे अशोक राठोड तहसीलदार सुमन मोरे मंडळ अधिकारी श्रीकांत गादेवाड दत्तप्रसाद झंवर तानाजी शेंडगे प्रभाकर वरकड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## समृद्धी महामार्गावरील भीषण अपघात प्रकरणी पीडितांना मोठ्या आर्थिक मदतीची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर मौजे कडवंची (ता. जालना) येथे दिनांक ०१ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या भीषण अपघातात ८ निरपराध महिला कामगारांचा मृत्यू झाल्याची अत्यंत दुर्दैवी घटना घडली असून ५ कामगार गंभीर जखमी अवस्थेत उपचार घेत आहेत. या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण जिल्ह्यात शोककळा पसरली असून नागरकिांमध्ये तीव्र संतापाची भावना व्यक्त होत आहे.

या घटनेची तात्काळ दखल घेत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांना पत्र पाठवून प्रधानमंत्री राष्ट्रीय राहत निधीतून () पीडित कुटुंबीयांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे. त्यांनी मृत कामगारांच्या कुटुंबीयांना किमान ₹२० लाख तर जखमी कामगारांना उपचारासाठी किमान ₹१० लाख आर्थिक सहाय्य तात्काळ देण्याची मागणी केली आहे. तसेच खासदार डॉ. काळे यांनी मा. जिल्हाधिकारी, मा. पोलीस अधीक्षक आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे मा. मुख्य अभियंता यांना स्वतंत्र पत्रे देऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची ठाम भूमिका मांडली आहे. आपल्या पत्रांमध्ये त्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे की, ही घटना केवळ अपघात नसून संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्या गंभीर निष्काळजीपणामुळे घडलेली आहे. त्यामुळे या प्रकरणात संबंधितांवर भारतीय दंड संहितेनुसार सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच महामार्गावरील कामगारांच्या सुरक्षेबाबत गंभीर त्रुटी, आवश्यक सेफ्टी किटचा अभाव, तसेच ‘‘छोटा हत्ती’’ वाहनाच्या अनधिकृत प्रवेशाबाबत सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित कंत्राटदारांनी कामगारांना पी.एफ., ईएसआयसी किंवा विमा संरक्षण दिले होते का, याची तपासणी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. खासदार डॉ. काळे यांनी मृत कामगारांच्या कुटुंबीयांना तात्काळ आर्थिक मदत, कुटुंबातील सदस्यांना कायमस्वरूपी नोकरी, तसेच जखमींच्या उपचाराचा संपूर्ण खर्च शासनामार्फत उचलण्याचीही मागणी केली आहे. ‘‘निरपराध व कष्टकरी कामगारांच्या मृत्यूला जबाबदार असणाऱ्यांना कोणतीही सूट मिळू नये. पीडित कुटुंबांना न्याय मिळवून देणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे,’’ असे ठाम मत खासदार डॉ. कल्याण काळे यांनी व्यक्त केले आहे. सदर प्रकरण अत्यंत संवेदनशील असून प्रशासनाने तात्काळ व प्रभावी कारवाई करून दोषींना कठोर शिक्षा करावी.

## परतूरमध्ये किराणा दुकानदाराला टोळक्याकडून बेदम मारहाण; भाचा आणि पत्नीलाही धक्काबुक्की

**परतूर । प्रतिनिधी -** परतूरमध्ये किराणा दुकानदाराला टोळक्याकडून बेदम मारहाण भाचा आणि पत्नीलाही धक्काबुक्की चा प्रकार समोर आला आहे तसेच मोमीन गल्ली येथे मुलांना दुकानासमोर गोंधळ घालण्यापासून रोखल्याच्या कारणावरून मोमीन गल्ली भागात एका ३८ वर्षीय किराणा दुकानदाराला १० ते १२ जणांच्या टोळक्याने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या हल्ल्यात दुकानदार अब्दुल हक खलील अन्सारी यांच्यासह त्यांचा भाचा आणि पत्नीलाही मारहाण करण्यात आली असून, जखमींवर जालना येथील सामान्य रुग्णालयात उपचार करण्यात आले आहे

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी अब्दुल हक अन्सारी यांचे मोमीन गल्लीत किराणा दुकान आहे. ५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास काही मुले दुकानासमोर गोंधळ घालत होती, तेव्हा अन्सारी यांनी त्यांना समजावून सांगून तेथून बाजूला केले होते. याच गोष्टीचा राग धरून त्याच दिवशी रात्री १०:३० वाजेच्या सुमारास सय्यद जहुर, सय्यद सलीम, सय्यद हसद, सय्यद अरशद, सय्यद आतीफ, सय्यद हुसेद आणि इतर ६ ते ७ जण अन्सारी यांच्या दुकानावर आले. ‘‘तू माझ्या मुलांना दुकानासमोर का खेळू देत नाहीस?‘‘ असे म्हणत सय्यद जहुर याने अन्सारी यांना चापट मारली. त्यानंतर इतर साथीदारांनी त्यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. ही मारहाण करत असताना आरोपींनी त्यांना दुकानापासून घरापर्यंत ओढत नेले. यावेळी त्यांचा भाचा फैजान अन्सारी हा सोडवण्यासाठी आला असता, त्यालाही छातीत लाथा मारून जखमी करण्यात आले. मध्यस्थी करण्यासाठी आलेल्या अन्सारी यांच्या पत्नीलाही आरोपींनी अश्लील शिवीगाळ व धक्काबुक्की केली.या राड्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. अखेर जुल्फेकार अन्सारी, निसार अन्सारी व आखील अन्सारी यांनी मध्यस्थी करून भांडण सोडवले. जखमी अब्दुल हक अन्सारी यांनी सुरुवातीला ग्रामीण रुग्णालय परतूर व त्यानंतर जालना येथे उपचार घेतले. उपचारानंतर त्यांनी परतूर पोलीस ठाण्यात धाव घेऊन संशयित आरोपींविरुद्ध रितसर तक्रार दाखल केली आहे. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## आयएएस अधिकाऱ्यांच्या बदलीचा सपाटा

**मुंबई -** राज्यात सध्या आयएएस () अधिकाऱ्यांच्या बदलीचा () सपाटा सुरू असून काही दिवसांपूर्वीच २५ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये, दिव्यांग कल्याण विभागाचे माजी सचिव तुकाराम मुंढे यांची देखील बदली करण्यात आली होती, त्यासंह अनेक जिल्हाधिकाऱ्यांचे खांदेपालटही केल्याचं दिसून आलं. त्यात, सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नागपूरच्या कलेक्टरपदी नियुक्ती करण्यात आली होती. आता, सामान्य प्रशासन विभागाकडून आणखी ११ आयएएस अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली आहे. राहुल रंजन महिवाल (आयएएस:आरआर:२००५), व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कृषी महामंडळ, पुणे यांची महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे येथे सदस्य सचिव पदावर बदली करण्यात आली आहे. तर, श्वेता सिंघल (आयएएस:आरआर:२००९) यांची विशेष निवासी आयुक्त, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली येथे बदली करण्यात आली आहे. त्यांसह आणखी बड्या अधिकाऱ्यांना नव्या ठिकाणी पोस्टींग देण्यात आलं आहे.

# जालना मनपा आमसभेत शिवसेनेचे नगरसेवक दुर्गेश काठोटीवाले यांनी शहर विकासासाठी महत्त्वाचे मुद्दे मांडले

**जालना । प्रतिनिधी** - जालना महानगरपालिकेच्या अलीकडे पार पडलेल्या आमसभेत शिवसेनेचे नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी शहरातील विविध मूलभूत समस्यांवर ठोसपणे आवाज उठवत प्रशासनासमोर अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडवण्याबरोबरच जालन्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी त्यांनी केली.

नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी सर्वप्रथम शहरातील पाणीटंचाईचा मुद्दा उपस्थित करत नागरिकांना दररोज नियमित पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी ठाम मागणी केली. तसेच, पाणी सोडताना महावितरण व पाणीपुरवठा विभाग यांच्यात योग्य समन्वय असणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

शहरातील वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही त्यांनी केली. नवीन जालना परिसरात नागरिकांसाठी सुंदर उद्यान उभारण्यात यावे आणि त्या उद्यानास बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात यावे, असा प्रस्ताव त्यांनी मांडला.

याशिवाय, शहरातील स्वच्छता व्यवस्थेबाबतही त्यांनी लक्ष वेधले. घंटागाडी (कचरा संकलन गाडी) नवीन द्याव्यात व नियमितपणे प्रत्येक भागात पाठवाव्यात, अशी मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली.

पत्रकार बांधवांसाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याची मागणी करत त्यांनी माध्यमांच्या कार्याला योग्य सुविधा मिळणे आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच, शहरातील सांस्कृतिक विकासासाठी फुलंब्रीकर नाट्यगृह उभारण्याचा प्रस्तावही त्यांनी मांडला.

संग्राम नगर परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांकडे लक्ष वेधत त्यांनी तेथील नाल्याची तात्काळ स्वच्छता करण्यात यावी, अशी मागणी केली.

शहराच्या भविष्यातील नियोजनासाठी मास्टर प्लॅन प्रभावीपणे राबवण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले यांनी मांडलेल्या या सर्व मुद्द्यांवर प्रशासनाने सकारात्मक दृष्टीकोन ठेवून त्वरित कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

राहुल मुळे यांच्या प्रयत्नांना यश

## महानगरपालीका सभागृहात दिव्यांगांसाठी ५ टक्के निधी मंजूर

**जालना** - सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांनी दिव्यांगांच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून जालना महानगरपालीका सभागृहात दिव्यांगांसाठी ५ टक्के निधी मंजूर करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे शहरातील दिव्यांग बांधवांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. राहुल मुळे यांनी काही दिवसांपूर्वी दिव्यांगांच्या प्रलंबित प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेत विविध स्तरांवरील पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन दिव्यांगांचे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले होते. या पार्श्वभूमीवर झालेल्या जालना महानगरपालिकेच्या सभागृहातील सर्वसाधारण बैठकीत दिव्यांगांसाठी ५ टक्के निधीच्या विषयावर चर्चा झाली. सभागृहातील सर्वच नगरसेवकांनी या मागणीला पाठिंबा दर्शवत आपले मत नोंदवले आणि आयुक्त, महापौर व उपमहापौर यांच्या उपस्थितीत हा महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आला.

या निर्णयानंतर सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे यांच्या आंदोलनाला मोठे यश मिळाल्याची भावना व्यक्त केली.

# स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या नेहा कोताकोंडा यांना राज्यस्तरीय सहकार सम्राज्ञी पुरस्कार प्रदान

### राज्यस्तरावर प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळणे ही संस्थेसाठी अभिमानास्पद बाब - अभय कुलकर्णी

**जालना । प्रतिनिधी** - महाराष्ट्र राज्य नागरी पतसंस्था फ ेडरेशन आणि कोल्हापूरच्या भागीरथी नागरी सहकारी पतसंस्थेच्यावतीने कोल्हापूर येथे पार पडलेल्या महिला सहकार मेळाव्यात जालन्यातील स्वामी विवेकानंद सहकारी पतसंस्थेच्या मुख्य शाखेतील सीनियर असिस्टंट नेहा कोताकोंडा यांना राज्यस्तरीय सहकार सम्राज्ञी या प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचे सक्षमीकरण करणे आणि त्यांच्या समस्यांना वाचा फोडणे या उद्देशाने आयोजित महिला मेळावा आणि सहकार सम्राज्ञी पुरस्कार प्रदान सोहळा कोल्हापूर येथील सायबर कॉलेजच्या आनंद भवन सभागृहात पार पडला. यावेळी कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, खासदार धनंजय महाडिक, फेडरेशनचे अध्यक्ष ओमप्रकाश कोयटे, महापौर रूपाराणी निकम, अरुंधती महाडिक आणि राजश्री पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल मान्यवरांच्या हस्ते ''सहकार सम्राज्ञी'' या राज्यस्तरीय प्रथम पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. या मेळाव्यास उपस्थित स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या पुनम रावेरकर, शरयू सराफ, प्रभा बोर्डे, रेखा गायके या चार महिला अधिकारी-कर्मचाऱ्यांनाही विशेष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल नेहा कोताकोंडा यांचे स्वामी विवेकानंद पतसंस्थेच्या संचालक मंडळाने विशेष अभिनंदन केले आहे. यावेळी बोलताना संस्थेचे



अध्यक्ष अभय कुलकर्णी म्हणाले की, आमच्या संस्थेतील कर्मचाऱ्याला राज्य स्तरावर प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळणे ही जालन्यासाठी आणि संस्थेसाठी अभिमानास्पद बाब आहे. महिला कर्मचाऱ्यांच्या निष्ठेचे हे फळ आहे. संस्थेचे सचिव प्रसन्ना जाफराबादकर म्हणाले की, नेहा कोताकोंडा यांच्या कामातील तत्परता आणि ग्राहकांशी असलेले सौजन्य यामुळेच हा बहुमान मिळाला आहे. हा पुरस्कार आगामी काळात इतर महिला कर्मचाऱ्यांनाही प्रेरणा देणारा ठरेल.

दरम्यान, या मेळाव्यात महिलांसाठी स्वतंत्र सहकार संचालनालय निर्माण करावे, नवीन संस्थेची नोंदणी करताना ५० टक्के महिलांचा सहभाग बंधनकारक असावा, लाडकी बहीण योजनेचे पैसे थेट पतसंस्थांच्या खात्यावर जमा करण्याची मुभा मिळावी, पतसंस्थांमधील ठेवींना विमा संरक्षण मिळावे आणि सोने तारण कर्जाबाबतच्या कायद्यात सुधारणा करावी आदी मागण्या करण्यात आल्या. पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी यावेळी पतसंस्थांसाठी लवकरच स्वतंत्र नियामक मंडळ स्थापन करण्याचे आश्वासन दिले, ज्याचे अध्यक्ष सहकार मंत्री असतील, असे ते म्हणाले.

राज्यस्तरीय पुरस्कार मिळाल्याबद्दल महाराष्ट्र पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काकासाहेब कोयटे, कोषाध्यक्ष दादाराव तुपकर, संचालिका श्रीमती अंजलीताई पाटील व फेडरेशनच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सुरेखा ताई लवांडे यांनीही नेहा कोताकोंडा व अन्य चार महिला अधिकारी कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले

# रोड स्वीपिंग मशिनद्वारे प्रभाग १५ आणि १४ मध्ये स्वच्छता मोहीम

**जालना । प्रतिनिधी** - जालना शहराला स्वच्छ आणि सुंदर बनवण्याच्या संकल्पातून आज जालना शहर महानगरपालिकेच्या वतीने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून स्वच्छता मोहिमेला गती देण्यात आली. दिनांक ७ एप्रिल २०२६ रोजी पहाटे ५:३० वाजल्यापासून प्रभाग क्रमांक १५ (नूतन वसाहत) आणि प्रभाग क्रमांक १४ च्या परिसरात रोड स्वीपिंग मशिन द्वारे व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेचे औचित्य साधून मा. महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे यांनी प्रभाग क्रमांक १५, नूतन वसाहत स्वच्छता विभागास प्रत्यक्ष भेट देऊन कामकाजाची पाहणी केली. सदरील झोनमध्ये प्रथमच रोड स्वीपिंग मशिन द्वारे रस्ते सफाईच्या कामाचा शुभारंभ करण्यात आला. आधुनिक यंत्रसामग्रीचा वापर केल्यामुळे शहरातील धूळ आणि कचरा अधिक प्रभावीपणे साफ होण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन यावेळी महापौरांनी केले.

प्रभाग १५ (नूतन वसाहत): या ठिकाणी नवीन मशिनद्वारे पहिल्यांदाच स्वच्छता करण्यात आली.

प्रभाग १४: पाठक मंगल कार्यालय ते मुक्तेश्वर तलाव या मुख्य रस्त्यावर मशिनद्वारे रस्ते झाडाई व स्वच्छता मोहीम राबवून परिसर चकाचक करण्यात आला.

उपस्थित मान्यवर व अधिकारी

या स्वच्छता मोहिमेप्रसंगी महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर, ज्येष्ठ समाजसेवक विजुभाऊ जाधव, स्वच्छता निरीक्षक अरुण वानखेडे, श्रावण सराते यांच्यासह महानगरपालिकेचे संबंधित विभागाचे कर्मचारी आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महानगरपालिका प्रशासनाने शहराच्या मुख्य रस्त्यांवरील धूळ आणि कचरा कमी करण्यासाठी या आधुनिक स्वीपिंग मशिनचा वापर वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे मानवी श्रमाची बचत होऊन स्वच्छतेचा दर्जा उंचावणार आहे. नागरिकांनीही स्वच्छ जालना या मोहिमेला सहकार्य करून आपले शहर कचरामुक्त ठेवावे, असे आवाहन यावेळी मा. महापौर यांनी केलेले आहे.

